नि.दि.मु.क्र. ०४/२०१७
चंद्रकांत व इतर वि. सुनिल व इतर
नि. ५

## :: आ दे श ::

१. अर्ज वाचला, नि. १३ वरील प्रतिवादींचा जबाब वाचला. प्रस्तुत अर्ज जानेवारी २०१७ पासुन युक्तीवादास प्रलंबित होता. दोन्ही बाजुतर्फे युक्तीवाद होत नसल्यामुळे हा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल, असा आदेश दि. १४.१०.२०१९ रोजी पारीत करण्यात आला. त्याप्रमाणे सदरचा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

२. मौजे भोगाव तालुका वाई येथील शेत जमिन गट क्र. ३३ क्षेत्रफळ १ हे. १३ आर तसेच गट क्र. ३२ चे पुर्वेस प्रतिवादी हे वादीचे मालकीचे विहीरीचा असणारा पाण्याचा पाटाचा प्रवाह उत्तर—दक्षिण वाहणारा व मध्ये पुर्व बाजुस अडीच फुटाची भिंत घालुन त्यात असणारा १० फुटाचा पाण्याचा पाट जेसीबीचे मदतीने उकरुन प्रतिवादींनी जे अतिक्रमण केले आहे अशी मिळकत हा दाव्याचा विषय आहे व सदरचे मिळकती बाबत वादींनी कायम व अनिवार्य मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता हा दावा दाखल केला आहे. वाद मिळकतीचे पुर्व बाजुस असणा—या पाण्याच्या पाटात व त्या ठिकाणी असणारे रोडला प्रतिवादींनी अडथळा निर्माण करु नये म्हणुन त्यांचे विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, याकरीता वादींनी हा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी नि. १३ वर त्यांचा जबाब दाखल केला आहे व हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व प्रतिवादींचे जबाबावरुन, हा अर्ज निकाली काढणे कामी मी खालील मुद्दे निश्चित केले आहेत व त्यावर माझा निष्कर्ष देवुन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. | अनुकुलतेचा समतोल वादींचे हक्कात आहे काय ? | ... नाही. |
| ३. | अर्ज नामंजुर केला तर वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... नाही. |
| ४. | काय आदेश ? | ... अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

## :: <u>का र ण मि मां सा</u> ::

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>** :

५. मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता वादींनी प्रथम दर्शनी केस त्यांचे हक्कात आहे काय, अनुकुलतेचा समतोल त्यांचे हक्कात आहे काय तसेच अर्ज नामंजुर केला तर त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे तीन घटक सिध्द करणे गरजेचे आहे. या शिवाय

वादी स्वच्छ हेतुने न्यायालया समोर आलेला असणे गरजेचे आहे.

६. वादपत्र व प्रतिवादींची लेखी कैफीयत तसेच दाव्यात दाखल कागदपत्रांचे मी अवलोकन केले आहे.

७. वादी हे मौजे भोगाव येथील शेत जमिन गट क्र. ३३ व प्रतिवादी हे शेत जमिन गट क्र. ३२ चे मालक व ताबेदार आहेत, ही बाब निर्विवाद असल्याचे वादपत्र व लेखी कैफीयत वरुन दिसुन येत आहे. त्यामुळे केवळ प्रतिवादी हे जेसीबी मशिनचे मदतीने पाण्याच्या पाटाचा प्रवाह बदलुन अतिक्रमण करणेचे प्रयत्नात आहेत व ज्यामुळे वादींना त्यांचे मिळकतीची वहीवाट करण्यास अडथळा निर्माण होत आहे, ही बाब पाहणे गरजेचे आहे.

८. गट क्र. ३२ चे पुर्व बाजुस वादीचे मालकीचे विहीरीचा पाण्याचा पाटाचा प्रवाह उत्तर—दक्षिण वाहणारा या भागात प्रतिवादींनी भिंत घालुन पाटाचा प्रवाह बदलला आहे, याबाबत तसेच अतिक्रमणा बाबत वादींनी या क्षणी त्यांचे तोंडी कथना शिवाय कसलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादींचे कथना नुसार गट क्र. ३२ मध्ये सरबांध किंवा पाण्याचा पाट असता तर त्याची नोंद सात बारा उता—यास झाली असती परंतु तशी नोंद सात बारा उता—यावर नसल्यामुळे वादींचे कथन ग्राहय धरता येणार नाही.

९. वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस असले बाबत या क्षणी वादींनी कसलाही पुरावा दाखल केलेला नाही. अर्ज नामंजुर केला तर वादींचे कशा प्रकारे नुकसान होणार आहे, याबाबत वादींनी या क्षणी

कसलाही पुरावा दिलेला नाही. वादी व प्रतिवादी हे आपआपले मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. प्रस्तुत अर्ज वादींचे हक्कात मंजुर करणे करीता माझे समोर पुरावा नसल्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u> :**

१०. मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत केल्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

ठिकाण : वाई. (व्ही. एन. गिरवलकर)
दिनांक : १८.१०.२०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.